# Regional Marathi Text Bulletin, Chatrapati Sambhajinagar

## Date – 14 March 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १४ मार्च २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- लोकसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाची दुसरी यादी जाहीर, बीड इथून पंकजा मुंडे, लातूर - सुधाकर श्रृंगारे, जालना - रावसाहेब दानवे, तर नांदेडमधून प्रताप पाटील चिखलीकर यांना उमेदवारी
- अहमदनगर शहर तसंच जिल्ह्याचं 'अहिल्यानगर' नामकरण करण्याला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी
- आशा स्वयंसेविकांच्या मानधनात पाच हजार रुपये वाढ

आणि

- जालना रेल्वे स्थानकावरच्या कोच देखभाल सुविधा–पीटलाईनचं उद्घाटन

****

लोकसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षानं आपली दुसरी यादी काल जाहीर केली. यात राज्यातल्या वीस जागांचा समावेश आहे. यापैकी मराठवाड्यात बीड इथून पंकजा मुंडे, लातूर इथून सुधाकर श्रृंगारे, जालन्यातून रावसाहेब दानवे, नांदेडमधून प्रताप पाटील चिखलीकर यांना उमेदवारी घोषित करण्यात आली आहे. याशिवाय नागपूरमधून नितीन गडकरी, पुणे–मुरलीधर मोहोळ, उत्तर मुंबई–पियुष गोयल, चंद्रपूर–सुधीर मुनगंटीवार, रावेर–रक्षा खडसे, अहमदनगर–सुजय विखे पाटील, माढा–रणजितसिंह नाईक निंबाळकर, सांगली–संजय पाटील, ईशान्य मुंबई–मिहिर कोटेचा, भिवंडी–कपिल पाटील, दिंडोरी– भारती पवार, वर्धा–रामदास तडस, जळगाव–स्मिता वाघ, धुळे–सुभाष भामरे, नंदुरबार– हीना गावित आणि अकोल्यातून अनूप धोत्रे यांना उमेदवारी घोषित करण्यात आली आहे.

****

अहमदनगर शहर तसंच जिल्ह्याचं 'अहिल्यानगर' असं नामकरण करण्याला राज्य मंत्रिमंडळानं मंजुरी दिली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली काल ही बैठक झाली. पुणे जिल्ह्याच्या वेल्हे तालुक्याचं नामकरण राजगड तसंच मुंबईतल्या आठ रेल्वे स्थानकांची ब्रिटिशकालीन नावं बदलण्याच्या निर्णयाला देखील मंत्रिमंडळानं मान्यता दिली.

अद्ययावत मराठी भाषा धोरण या बैठकीत जाहीर करण्यात आलं. या धोरणानुसार मराठीतल्या सर्व बोली भाषांचं जतन, संवर्धन, प्रचार, प्रसार आणि विकास करणं तसंच माहिती तंत्रज्ञान, चॅट जीपीटी सारख्या नवतंत्रज्ञानात मराठीचा जास्तीत जास्त उपयोग करण्यात येईल.

राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत राज्यातल्या दहा वर्ष आणि त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना, शासकीय सेवेत सामावून घेण्याचा, तसंच शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये सध्या कार्यरत २९७ कंत्राटी शिल्पनिदेशकांना, कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागात सामावून घेण्यास, मंत्रिमंडळानं मान्यता दिली.

राज्यातल्या आशा स्वयंसेविकांच्या मानधनात पाच हजार रुपये वाढ करण्यावा निर्णयही यावेळी घेण्यात आला असून, नोव्हेंबर, २०२३ पासून ही वाढ देण्यात येणार आहे.

जालना – खामगाव नवीन ब्रॉडगेज रेल्वे मार्गासाठी राज्य शासनातर्फे दोन हजार ४५३ कोटी रूपये खर्चास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या रेल्वे मार्गासाठी चार हजार ९०७ कोटी ७० लाख रुपये खर्च येणार असून, पन्नास टक्के रक्कम राज्य शासन भरणार आहे.

****

पोलीस पाटलांच्या मानधनात १५ हजार रुपये वाढ, लहान शहरांमध्ये अग्निशमन सेवा बळकट करण्यासाठी १५३ कोटी रूपयांची मंजुरी, भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजनेत ५० वर्ष मुदतीचं बिनव्याजी कर्ज, शुभमंगल सामूहिक विवाह योजनेला २५ हजार रुपये अनुदान, वीज वितरण प्रणालीचं सक्षमीकरण करण्यासाठी ११ हजार ५८५ कोटी रुपयांच्या प्रकल्पाला मान्यता, मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेत २३ हजार किलोमीटर रस्ते बांधणी, तसंच जम्मू काश्मिरमधील श्रीनगर विमानतळाजवळ महाराष्ट्र राज्य अतिथीगृह बांधण्यासाठी अडीच एकर भूखंड घेण्यास कालच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

****

काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांची भारत जोडो न्याय यात्रा काल नाशिक जिल्ह्यात दाखल झाली. मालेगाव इथं नव्या बस स्थानकाच्या परिसरात झालेल्या सभेत त्यांनी नागरीकांना संबोधित केलं. यावेळी त्यांनी केंद्रातल्या भाजपा सरकारवर कठोर टीका केली.

दरम्यान, काल या यात्रेदरम्यान गांधी यांनी धुळे जिल्ह्यात धुळे – आग्रा रस्त्यावर रोड शो करत, छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाजवळ उपस्थित जनसमुहाला संबोधित केलं. महिला सक्षमीकरणासाठी महिला न्याय हक्क परिषद योवळी घेण्यात आली. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी या परिषदेला दूरदृश्य प्रणालीद्वारे संबोधित केलं. काँग्रेस पक्ष 'महालक्ष्मी गॅरंटी', 'अर्धी लोकसंख्या पूर्ण हक्क', 'शक्ती का सम्मान', 'अधिकार मैत्री' आणि 'सावित्रीबाई फुले महिला वसतिगृह', या पाच महिला गॅरंटी देत असल्याचं खरगे यांनी सांगितलं.

****

दरम्यान, माजी मंत्री पद्माकर वळवी यांनी काल भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या पक्ष प्रवेशाच्या कार्यक्रमाला प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

****

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी काल वाशिम जिल्ह्यात वाशिम आणि कारंजा इथं जनसंवाद मेळाव्याला संबोधित केलं. यावेळी त्यांनी भारतीय जनता पक्षावर कडाडून टीका केली.

****

माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग सिंह ठाकूर यांनी काल नवी दिल्लीत आकाशवाणी आणि दूरदर्शन बातम्यांच्या सुधारित संकेतस्थळांचं तसंच सुधारित न्यूज ऑन एआयआर ॲपचं लोकार्पण केलं. प्रसार भारती आता विविध भाषांमधल्या वृत्तसंस्थांना व्हिडिओ, ऑडिओ, फोटो आणि वाचन साहित्य देण्यासाठी सज्ज असल्याचं ठाकूर यांनी सांगितलं.

****

हैदराबाद मुक्तिसंग्राम दिन दरवर्षी १७ सप्टेंबर रोजी देशपातळीवर साजरा करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल, आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्यासह मराठवाडा मुक्तीसंग्राम अमृत महोत्सव समितीचे संयोजक युवराज नळे आणि इतर

पदाधिकाऱ्यांनी केंद्र सरकारचे आभार मानले. छत्रपती संभाजीनगर इथल्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा संशोधन संस्थेचे अध्यक्ष डॉ. एस. बी. वराडे यांनी या शब्दांत केंद्र सरकारचे आभार मानले...

***''हा राष्ट्रीय संग्राम म्हणून त्याला खऱ्या अर्थाने राष्ट्रीय प्रमाणपत्र मिळाल्यासारखं झालंय. पुढील पिढीला त्याचा चांगलाच आदर्श मिळेल. आणि त्या दृष्टीनं मी त्यांचे आभार मानतो.''***

****

वंचित, मागास समाजाला शासनाच्या योजनांचा लाभ देण्यासाठी पीएम सूरज या पोर्टलचं अनावरण काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालं.

हिंगोली इथं या कार्यक्रमाला केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे उपस्थित होते. सामाजिक न्याय विभागाच्या विविध तीन महामंडळांमार्फत देण्यात येणा-या कर्जाचं वितरण यावेळी लाभार्थ्यांना करण्यात आलं. धुळे इथं केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.

नांदेड इथं सफाई कामगार तसंच आयुष्यमान योजनेच्या लाभार्थ्यांना या कार्यक्रमाचं थेट प्रक्षेपण दाखवण्यात आलं. यावेळी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या योजनेतून लाभार्थ्यांना कर्ज वाटपही करण्यात आलं.

****

छत्रपती संभाजीनगर इथं काल स्वनिधी से समृद्धी संमेलन अंतर्गत कर्ज वाटप मेळावा पार पडला. केंद्रीय अर्थराज्यमंत्री भागवत कराड यांच्या उपस्थितीत झालेल्या या मेळाव्यात लाभार्थ्यांना केंद्र तसंच राज्य सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ एकाच छताखाली देण्यात आला.

****

जालना रेल्वे स्थानकावर तयार करण्यात आलेल्या कोच देखभाल सुविधा - पीटलाईनचं काल केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या हस्ते उद्घाटन झालं. मुंबई-जालना वंदे भारत एक्स्प्रेसच्या मुंबई इथून सुटण्याच्या वेळेत बदल करून ही गाडी संध्याकाळी पाच वाजेदरम्यान सोडण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना केली. नांदेड रेल्वे विभागातलं विद्युतीकरणाचं काम या महिना अखेरीस पूर्ण होईल, अशी माहिती दानवे यांनी यावेळी दिली.

****

नवमतदारांसाठी, मेरा पहला वोट देश के लिए, हे मतदार जागरूकता अभियान सरकारने सुरु केलं आहे. परभणी जिल्ह्यातल्या गंगाखेड इथली युवती वैष्णवी यादव हिने सर्व नवमतदारांना मतदान करण्याचं आवाहन केलं आहे....

****

नांदेड जिल्ह्यात मतदार जनजागृती मोहीमेअंतर्गत प्रशासनानं रील आणि शॉर्ट फिल्म तयार करण्याच्या स्पर्धेचं आयोजन केलं आहे. पात्र मतदारांनी ३० सेकंदाचे रील आणि पाच मिनिटांची शॉर्ट फिल्म तयार करून २० तारखेपर्यंत स्वीप नांदेड ॲट जीमेल डॉट कॉम, या ईमेलआयडीवर पाठवावी असं आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी काल गंगापूर आणि वैजापूर इथं लोकसभा निवडणूक तयारीचा आढावा घेतला. सर्व यंत्रणेनं संवाद, समन्वय आणि सहकार्य या त्रिसूत्रीवर काम करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बीड इथं केंद्रीय राखीव पोलीस दल तैनात करण्यात आलं असून, पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी काल या तुकडीतल्या पोलिसांना मार्गदर्शन केलं.

****

धाराशिव इथल्या सुधारित हवाई धावपट्टीची आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी काल पाहणी केली. या धावपट्टीची नव्याने सुधारणा झाल्यामुळे जिल्ह्याच्या विकासात मोठी भर पडणार असून, इथून स्थलांतरित झालेलं वैमानिक प्रशिक्षण केंद्र देखील पुन्हा सुरू करण्यासाठी आपले प्रयत्न सुरू असल्याचं, आमदार पाटील यांनी सांगितलं.

****

नांदेड जिल्ह्यातल्या नांदेड, घुंगराळा, दिग्रस बूद्रुक ही तीन नवीन महसूल मंडळं, दुष्काळ सदृष्य मंडळं म्हणून घोषित करण्यात आली आहेत. या महसूली मंडळासाठी सवलती लागू करण्याचे आदेश जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिले आहेत.

****

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील गेले दोन दिवस लातूर जिल्हा दौऱ्यावर होते. लातूर सह जिल्ह्यात अहमदपूर, निलंगा, माटेफळ, नागझरी इथं त्यांच्या संवाद बैठका झाल्या.

****